प्रेस नोट दिनांक ०१/०९/१७

गेले एक महिन्याच्या कालावधीत वारजे माळवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोडी चो-यांच्या घटनामध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली होती. घडणा-या घरफोडी चो-यांना प्रतिबंध करणे व घडलेले गुन्हे उघडकीस आणणे असे दुतर्फा आवाहन पोलीसांना होते. घडलेल्या घरफोडी चो-या उघडकीस आणणेकामी अपर पोलीस आयुक्त सोा. श्री. रविंद्र सेनगावकर, परिमंडळ १ चे पोलीस उप-आयुक्त सोा. डॉ बसवराज तेली यांनी रेकॉर्ड वरील गुन्हेगारांना चेक करणे, जेल मधून नुकत्याच सुटलेल्या गुन्हेगारांची माहिती काढून त्यांच्या हालचालीवर वॉच ठेवणे, बाधित क्षेत्रात नाकाबंदी व ट्रॅपचे आयोजन करणेबाबत आदेश दिले होते. सदर आदेशा प्रमाणे सहा.पोलीस आयुक्त किशोर नाईक यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाजीराव मोळे यांनी बीट मार्शल व तपास पथकातील कर्मचा-यांसह काम करून मिळालेल्या माहिती नुसार दि २६/०८/१७ रोजी कर्वेनगर, पुणे परिसरात २०.१५ वा चे सुमारास एका काळया रंगाच्या शाईन मोटर सायकल नं एम.एच. १२ पी.ई ४२२४ वरून पाठीवर सॅक लावून आलेल्या संशयित इसमास सापळा रचून शिताफीने पकडून त्यास त्याचे नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नाव प्रणव विकास चांदगुडे वय १९ वर्ष रा. फ्लॅट नं १०१ ए विंग तुषार हाईटस दांगट पाटील नगर, शिवणे, पुणे असे असल्याचे सांगितले. त्याचेबाबत संशय बळावल्याने त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे सॅकमध्ये एक ३५ सेमी चा लोखंडी रॉड, एक लेडीज पर्स त्यामध्ये ३ चांदीचे पैंजण व ७०००/-रू रोख असा माल मिळून आला. तेव्हा त्यास विश्वासात घेऊन त्याचेकडे अधिक विचारपूस केली असता, त्याने दि २५/०८/१७ रोजी दु ०३.३० वा चे सुमारास कर्वेनगर गल्ली नं १ येथे घरफोडी चोरी केल्याचे व त्या चोरीत हा सॅक मधील माल मिळाला असल्याचे कबूल केले. गल्ली नं १ येथील झालेल्या घरफोडी चोरीबाबत वारजे माळवाडी पो.स्टे गु.रजि.नं. ३२९/१७ भा.द.वि.कलम ४५४, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल असल्याने प्रणव चांदगुडे यास सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

अटक मुदतीत प्रणव चांदगुडे याचेकडे तपास केला असता, त्याने वर नमूद गुन्हया व्यतिरिक्त वारजे माळवाडी पो.स्टे हद्दीतील १) गु.रजि.नं. ११७/१७ भा.द.वि.कलम ४५४, ३८० २) गु.रजि.नं. ३०१/१७ भा.द.वि.कलम ४५४, ३८० ३) गु.रजि.नं. ३१०/१७ भा.द.वि.कलम ४५४, ३८० ४) गु.रजि.नं. ३२१/१७ भा.द.वि.कलम ४५४, ३८० ५) गु.रजि.नं. ३३३/१७ भा.द.वि.कलम ४५४, ३८० ६) गु.रजि.नं. ३३५/१७ भा.द.वि.कलम ४५४, ३८० ७) गु.रजि.नं. ३३६/१७ भा.द.वि.कलम ४५४, ३८० अशा एकूण ८ दिवसाच्या घरफोडया, उत्तमनगर पोलीस ठाणे हद्दीतील १) गु.र.नं. ३७/१७ भा.द.वि.कलम ४५४, ३८० २) गु.रजि.नं. ७५/१७ भा.द.वि.कलम ४५४, ३८० तसेच पुणे ग्रामीण अंतर्गत पौड पोलीस ठाणे हद्दीतील गु.र.नं. १७२/१७ भा.द.वि.कलम ४५४, ३८० असे एकूण ११ दिवसा घरफोडी चोरीचे गुन्हे केल्याची कबूली दिली. तसेच सदर चो-यांमध्ये मिळालेले सोन्या चांदीचे दागदागिने इसम नामे श्रीकांत नंदकुमार झगडे वय २१ रा. ८४/१६५ आर्मन सोसायटी, कचरा डेपो समोर, कोथरूड, पुणे व कमलेश संतोष मोकर वय २९ रा. मु.पो. मातळवाडी फाटा, भुगाव ता. मुळशी जि. पुणे यांचे मार्फतीने विक्री केले असल्याचे सांगितल्याने त्यांना देखील अटक करण्यात आली आहे. वर नमूद गुन्हयातील चोरीस गेले ७०८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने किं.रू १७,७२,०००/- चे, ९०० ग्रॅम चांदीचे दागिने किं.रू ३६,०००/- तसेच ३६,०००/-रू रोख असा सर्व मिळून किं.रू १८,४४,०००/- चा माल हस्तगत करण्यात आला आहे.

वर नमूद गुन्हे उघडकीस आणणेकामी वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाजीराव मोळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) प्रकाश खांडेकर, सहा.पो.निरी. बाळासाहेब शिंदे, पो.उप-निरी. सिताराम धावडे, स.पो.फौज. जगन्नाथ गोरे, पो. ना. अमर भोसले, बालारफी शेख, संतोष देशपांडे, चंद्रकांत जाधव, सुधीर पाटील, पो.शि. सुभाष गुरव, विजय कांबळे, संजय दहिभाते व संदिप शेळके यांनी अत्यंत कसोशीने प्रयत्न केले आहेत.